नियमीत फौ. ख. क्र.३१/२०१७
सरकार -वि.- देविदास व इतर
नि.क्र. ६५.

**<u>उलट तपास आरोपींतर्फे वकील श्री खानोरकर यांचे मार्फत</u>**

६. मी मोटार सायकल पकडल्यास तेव्हा माझ्या सोबत माझा स्टाफ होता. त्यावेळी माझ्या सोबत एम. डब्ल्यु ठवरे व वनरक्षक एम. डी. केंद्रे हजर होते. मी दोन मोटार सायकल पकडल्या होत्या. रात्रीची वेळ होती. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या आजुबाजुला तळे होते. हे म्हणणे खरे नाही की, मला जप्तीमध्ये जाळे मिळुन आले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींनी सांगितले होते की, मासेमारीकरिता आले होते. मी ज्या ठिकाणी कारवाई केली त्याच्या आजुबाजुला जंगल होते. हे म्हणणे खरे नाही की, जंगल असल्यामुळे आजुबाजुचे लोकं जंगली प्राण्यांमुळे सोबत हत्यारे घेवुन फिरतात. आजुबाजुला जंगली प्राणी आहे.

७. मी एकूण दोन गाड्या पकडल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, मला त्या दोन गाड्यासोबत कोणताही वन्य प्राणी मिळून आले नव्हते. मी पंचनामे उमरेड येथे केले होते. साक्षीदार पुन्हा सांगतो मी पंचनामे घटनास्थळावर उमरेडवरुन येवून पुन्हा केले होते. मी पंचनामे सकाळी केले होते.

प्रश्न - ज्यावेळी तुम्ही वाहन जप्त केले त्याच वेळी तुम्ही पंचनामे का केले नाही?

उत्तर - त्यावेळी अंधार असल्यामुळे व परिस्थिती सुयोग्य नव्हती म्हणूण मी पंचनामे केले नाही.

प्रश्न - तुमच्याकडे मोबाईल असतानाही तुम्ही पंचनामे का केले नाही?

उत्तर - घटनेच्या वेळी एकूण पाच गाड्या होत्या त्यापैकी तीन गाड्यावरील व्यक्ती पळून गेले होते व ते पुन्हा येवून आमच्यावर हल्ला करु शकतात या कारणास्तव मी पंचनामा तयार केला.

८. पळुन गेलेले आरोपी माझ्यावर हल्ला करु शकतात या संदर्भात वरिष्ठांना कळविले होते. मी आता हे सांगु शकत नाही की, मी वरिष्ठांना कळविण्यासंदर्भात नोंद कुठे ठेवली होती. मी पंचनाम्यामध्ये आरोपी हल्ला करु शकतात त्यामुळे पंचनामा केला नाही असे नमुद केले नव्हते. मी गाड्या पकडल्यानंतर उमरेड आलो व त्यानंतर पंचनामा तयार

केला. मी उमरेडला आल्यानंतर वरिष्ठांना भेटलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनामा उमरेड येथे तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींच्या ताब्यातुन कोणताही वन्य प्राणी आढळून आला नाही. मी जप्त केलेल्या मोटार सायकलचे नंबर आता सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला व माझ्या वरिष्ठांना आरोपींचा बयाण घेण्याचे अधिकार नव्हता.

९. वन विभागात वन्य प्राणी मिळाल्याबाबत बरेच प्रकरण नोंद आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या प्रकरणांमध्ये त्या वन्य प्राण्यांचे फोटो काढलेले असतात. तो सर्व अभिलेख वन विभागाच्या कार्यालयात असतो. हे म्हणणे खरे नाही की, जप्त केलेले हत्यार हे खाजगी उपयोगाचे होते. आरोपी माझ्याकडे एक दिवस कस्टडीमध्ये होते. सुरवातीला मी तीन आरोपी पकडलेले होते. तीन आरोपी कस्टडीमध्ये होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या कस्टडीमध्ये असताना मी खोटे बयाण लिहून घेतले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आरोपीचे खोटे बयाण तयार केले.

१०. मी सदर गुन्ह्यामध्ये एकूण सहा आरोपी फरार दाखविले आहे. हे म्हणणे खरे आहे की, एक आरोपीचा आजतागायत पत्ता लागलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींकडून कुठलीही बंदूक जप्त झाली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मृत वन्य प्राण्यांवर कुठलेही बंदुकीच्या गोळीचे निशाण आढळून आले नाही. हे मला आठवत नाही की, जप्त केलेल्या मृत वन्य प्राण्यांचे शवविच्छेदन केले होते किंवा नाही. हे म्हणणे खरे आहे की, बंदुकीची गोळी लागल्यावर त्वचेवरील सुरुवातीचा भाग काळा होतो. मी तो त्वचेचा भाग काळ्या झाल्यासंदर्भात पंचनाम्यात नमूद केला नाही. हे मला आठवत नाही की, बंदुकीची गोळी मिळाली होती किंवा नाही. हे मला आठवत नाही की, वैद्यकिय अधिकाऱ्यांना बंदुकीची गोळी मिळून आली किंवा नाही. कार्यालयामध्ये असताना सदर केसचे दस्त माझ्या नेहमी पाहण्यात येते. वन्य प्राण्यांचे दहन माझ्या समक्ष झाले होते. हे मला आठवत नाही की, दहन करतेवेळी वन्य प्राण्यांची त्वचा बंदुकीची गोळी लागून काळी झाली होती किंवा नाही.

११. हे मला लक्षात नाही की, जप्त केलेल्या सतुवर वन्य प्राण्यांचे रक्त, मास व केस लागले होते किंवा नाही. ज्या पोत्यामध्ये वन्य प्राणी ठेवले होते त्याला रक्त लागले होते. मी पोते जप्त केले होते. मी ती गोणी न्यायालयात दाखल केली नव्हती. मी ती पोती

जप्त केली नाही कारण ती खराब झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी कुठलेही पोते जप्त केले नव्हते. पोते एका वर्षात खराब होवू शकतात. मी आरोपींना कोर्टात हजर केले होते. त्यावेळी मी पोते न्यायालयात सादर केले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींच्या पहिल्या पेशीच्यावेळी पोते न्यायालयात आणले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, पोती कुठेही मिळतात. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींवर खोटे आरोप लावले व खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक २०.०१.२०२६.

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.